प्रेस नोट ता. ०२/०८/२०१८

रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

आज दि. ०२/०८/२०१८ रोजी सायं. ५/३० वा. चे सुमारास इसम नामे. प्रकाश मोतीराम करमचंदानी वय.७२ वर्षे व्यवसाय. व्यापार रा.एन.आय.बी.एम.रोड कोंढवा खुर्द पुणे हे कोंढवा पोलीस स्टेशन येथे त्यांचे व्यवसायाचे पैसे रिक्षामध्ये विसरले आहेत अशी तक्रार देणेकामी आले होते.

त्या दरम्यान त्यांना त्यांचे घरुन फोन आला की, रिक्षामध्ये विसरलेले पैसे रिक्षाचालक स्वत: घरी घेवुन आलेले आहेत म्हणुन आम्ही सदर रिक्षाचालकास कोंढवा पोलीस स्टेशन येथे बोलावुन त्यांचेकडे चौकशी केली असता,रिक्षाचालक नामे. मारुती दगडु वाघमारे वय. ६० वर्षे रा. गणेश मळा,सिंहगड रोड पुणे. यांनी सांगितले की, मी पॅसेंजर म्हणुन प्रकाश करमचंदानी यांना मार्केटयार्ड येथुन घेवुन एनआयबीएम कोंढवा येथील त्यांचे घरी सोडले होते. त्यानंतर मी गॅस भरण्यासाठी पेट्रोलपंपावर गेलो होतो. तेथे रिक्षामध्ये पाठीमागिल शीटवर एक पिशवी दिसली. पिशवीमध्ये काय आहे ते पाहता त्यामध्ये मला पैशाचे बंडल दिसल्याने मी लगेच पॅसेंजरचे घरी त्यांचे पैसे परत देण्याकरीता गेलो होतो.

रिक्षाचालक मारुती दगडु वाघमारे वय. ६० वर्षे रा. गणेश मळा, सिंहगड रोड पुणे यांनी पॅसेंजर प्रकाश करमचंदानी यांचे रिक्षामध्ये विसरलेले ५ लाख रुपये प्रामाणिकपणे परत दिल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मिलिंद गायकवाड यांनी त्यांचे कौतुक करुन प्रामाणिकपणाबद्दल शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आलेला आहे.

रिक्षाचालक यांनी माणुसकीचा व प्रामाणिकपणाचा धडा घालुन दिलेला आहे.

